# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २४/०१/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान:— अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील खदान क्र. ३, ब्लॅक डायमंड स्टेडियम जवळ येथे दिनांक २२/०१/२०२२ चे १८.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शुभम केशरीचंद खगारे (सेक्युरीटि गार्ड डब्लुसीएल), वय २९ वर्ष, रा. पिपरी दुर्गा मंदीर जवळ कन्हान व त्याचा खाजगी ड्रायव्हर सह डब्लुसीएल कामठी ocm येथे पेट्रोलींग कामी जात असतांना यातील आरोपी क्र. १) समिर सिध्दिकी व २) प्रमोद सिंग रा. खदान नं. ४ हे तेथे आले व एमएच— ४०/बीआय— ४९५३ क्रमांकाचा ट्रकचा चालकास विनाकारण शिवीगाळ करू लागले. त्यादरम्यान फिर्यादी व त्याचा चालक आपले गाडीतुन उतरून उभे असता आरोपी क्र १ याने फिर्यादीचे गाडीवर लाकडी दांडयाने मारून गाडीचे बोणेट चेपकवुन अंदाजे १०,०००/—रू. चे नुकसान केले. फिर्यादीने त्यास म्हटले असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीस अश्लिल भाषेत शिवीगाळ करून फिर्यादीचे वर्दीचे कॉलर पकडुन कॉलरचे ३ बटन तोडले व हातबुक्कीने मारहाण केली. आरोपी क्र २ याने शिवीगाळ करून ढक्कल—ढुकल केले व शासकीय कामात अडथळा निर्माण केला व सिल पॉइट येथील २०० सील पट्टया जाळुन ५०० रू. चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५३,३३२,२९४,५०६,४२७,३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मेश्राम मो.नं. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा खानगाव शिवार पंढरी ताजने यांचे शेतातील विहीरीत दिनांक २२/०१/२०२२ चे १६.०० वा. ते दिनांक २३/०१/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान **हेमंता पंढरी ताजने (मृतक), वय २९ वर्ष, रा. खानगाव ता. सावनेर** हा त्याचे वडीलाचे पंढरी ताजने यांचे नावाने बँक ऑफ बडोदा चे १०,००००/— रूपयाचे कर्ज असल्याने व यावर्षी शेतात पीक न झाल्याने यातील मृतक याने स्वताचे वडीलाचे शेतातील विहीरीत उडी घेउन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ओमकार पांढुरंग ताजने वय ४५ वर्ष रा. खानगाव ता. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नाईक सुधीर यादगीरे मो.न. ८८८८६५८७१३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर